ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

नदी विशेषांक

# तिफण

दिवाळी - २०२३


वर्ष : १४ वे । अंक : तिसरा / चौथा
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३



थकली ओंजळ घेऊन फिरता
आभाळ तिजला थांबवते
तहान होऊन उभी माय मग
नदीतूनी आकाश पिते ...

– अरूण म्हात्रे

• वर्ष : १४ वे । अंक : तिसरा/चौथा
*ऑक्टोबर ते डिसेंबर : २०२३*




# तिफण

नदी विशेषांक
दिवाळी २०२३


संपादक
डॉ. शिवाजी भिकाजी हुसे

रेखाटने : जितेंद्र साळुंके, संतोष तांदळे

४२. जैविक संवेदनांचे आत्मिक दोलन मांडणारी कादंबरी : नदीष्ट ... २४३
४३. मानवी जीवन संस्कृतीचा अविभाज्य भाग : नदी... जीवनसरिता ... २४८
४४. गोदाकाठचा शब्दमय प्रवाह : 'नदीष्ट' ... २५४
४५. सुखनामायच्या विनाशपर्वाची कर्मकहाणी ... २५८
४६. नदीची व्यथा मांडणारी कविता : 'सुखना मायची कहाणी' ... २६२
४७. महापुराचा सामना करणाऱ्या शेतकऱ्याची संघर्ष गाथा : पाणीफेरा ... २६७
४८. 'जलसंवाद' या नियतकालिकाचे 'नदी' संवर्धनातील योगदान ... २७१
४९. नदीजोड प्रकल्प : वास्तविकता आणि आव्हाने ... २७५
५०. 'वारणा' पावसाळ्यात महापुराचे थैमान का मांडते? ... २८७
५१. महाराष्ट्रातील नदीकाठची धार्मिक स्थळे ... २९१
५२. पूर्व विदर्भातील जीवनदायिनी – वैनगंगा ... २९८
५३. भारताचे राष्ट्रीय जल अभियान आणि नदी प्रकल्प: एक परिचय ... ३०६
५४. गंगा नदी : पौराणिक इतिहास व सद्यःस्थिती ... ३१३
५५. 'भारतातील राष्ट्रीय नदी जोड प्रकल्प : स्वरूप आणि परिणाम' ... ३१८
५६. जीवनदायी गंगा नदी - प्रदूषण आणि संरक्षण: एक आढावा ... ३२७
५७. मराठी ग्रामीण ललित गद्यातील नदी- पाणवठ्याकाठच्या संस्कृतीचं चित्रण ... ३३६
५८. जैवविविधता... एक वरदान ... ३४२
५९. खडकपूर्णा नदीचा उगम व सामाजिक सांस्कृतिक इतिहास ... ३५२
६०. तीर्थरूपी नदी उगमास ... ३५७
६१. नर्मदेच्या तीरा-तीराने ... ३६१
६२. लढा सुखना नदीच्या अस्तित्वाचा ... ३६७
६३. भोरडी नदीचा कायापालट करणारे जलमित्र : भाऊसाहेब घुगे ... ३७२
६४. अति धार्मिकता, कर्मकांड आणि अंधश्रद्धा नद्यांना मारक ठरतात - एक चिकित्सा (गोदावरी नदीच्या विशेष अनुषंगाने) ... ३७५
६५. गाव शिवासाठी नदी पणाला जागते ... ३८३
६६. नदी वाचविण्यासाठी कवींचा पुढाकार ... ३८५

. प्रति
. कीत
. सौ.
. डॉ.
. अश
. तुक
७. प्रा.
८. डॉ.
९. उत्त
१०. श्री.
११. अरु
१२. सचि
१३. डॉ.
१४. जय
१५. रोश
१६. जि
१७. लक्ष
१८. देवि
१९. ज्ञा
२०. डॉ.
२१. चंद्र
२२. पी.





-प्रा.डॉ. सिल्केशा भारत अहिरे, *नाशिक*

*लेखिका शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.*

-प्रो.डॉ. प्रतिभा अहिरे, *छत्रपती संभाजीनगर*

*लेखिका शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.*

**रामायण काळात नाशिकचा उल्लेख दंडकारण्य असा आहे. राम आपल्या १४ वर्षे वनवासाच्या कालावधीत येथेच राहिले. आजही गोदावरीत रामकुंड, सीताकुंड, तपोवन सारखी ठिकाणे या जुन्या पौराणिक उपासनेची झलक देतात. नाशिक 'पंचवटी' म्हणून ओळखले जाते. राजा दशरथ वनवासात असताना रामाने आपल्या वडिलांचे दशरथाचे देहदान गोदावरी किनार्यावर केले होते. या सर्वामुळे गोदावरी नदी एक पवित्र स्थान आहे.**

# अति धार्मिकता, कर्मकांड आणि अंधश्रद्धा नद्यांना मारक ठरतात - एक चिकित्सा

## (गोदावरी नदीच्या विशेष अनुषंगाने)

### प्रस्तावना

जगातील सर्व प्राचीन संस्कृती नद्यांच्या काठी निर्माण झाल्या,या एका संदर्भावरूनच नद्यांचे महत्त्व अधोरेखित होते.दैनंदिन जीवनातही 'पाणी म्हणजे जीवन', 'जल हैं तो कल हैं!' असे म्हणत पाण्याचे महत्त्व सांगतो,मात्र असे असले तरी वास्तव जीवन जगताना मनुष्य प्राणी ह्या पाण्याचे,नद्यांचे पाहीजे तसे संरक्षण व संवर्धन करताना दिसून येत नाही.भारतीय लोक नदीला माते समान मानतात,पवित्र जलदेवता म्हणून पूजतात. मात्र हे पूजन करताना अप्रत्यक्षरीत्या नद्यांच्या मुळावरच

आपण घाला घालत आहोत हे मानव विसरतो व जलप्रदूषणात भर टाकतो. वास्तविक जलप्रदूषणाचे मुख्य स्त्रोत म्हणजे घरगुती कचरा(सांडपाणी),औद्योगिक कचरा,शेतकचरा व औष्णिक प्रदूषण. मात्र या सर्वांबरोबरच अंधश्रद्धा धार्मिक कर्मकांडाचा अतिरेक हे देखील नदी प्रदूषणाचे एक महत्त्वाचे कारण होय, त्यामुळे या घटकाचा प्रामुख्याने विचार करणे गरजेचे ठरते. कारण ज्याप्रमाणे इतर प्रदूषण स्त्रोत वर्षभर कार्यरत असतात त्याचप्रमाणे धार्मिक कर्मकांड देखील वर्षभर सुरूच असतात. त्यामुळे या संदर्भात विचार होणे व त्यावर उपाययोजना करून निर्बंधात्मक कार्यवाही करणे ही नदीच्या संवर्धनासाठी आवश्यक बाब बनली आहे.

भारतातील सात पवित्र नद्यांपैकी एक मानली जाणारी गोदावरी नदी ही दक्षिण भारतातील पवित्र नदी आहे. द्वीपकल्पीय नद्यांच्या दुसऱ्या उपनद्यांपैकी ही सर्वात मोठी नदी असल्याने तिला दक्षिणगंगा असेही म्हणतात. मात्र अशी ही दक्षिणगंगा देखील प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे तेव्हा गोदावरी नदीच्या विशेष अनुषंगाने अंधश्रद्धा कर्मकांड अति धार्मिकता नद्यांना कशी मारक ठरते, यावर उपाययोजना कशी करावी? याचा विचार प्रस्तुत शोधनिबंध करणार आहे.

**गोदावरी नदी**

गोदावरी ही दक्षिण भारतातील प्रमुख नदी आहे गोदावरी नदीला गोदावरी हे नाव तेलगू शब्द గోదావరి 'लॅप' वरून मिळाले असे म्हंटले . तिचा उगम पश्चिम घाटात महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी पर्वतात होतो.

नदीची सरासरी लांबी १४६५ किलोमीटर असून दरवर्षी सुमारे ३७,८३० दशलक्ष घनमीटर पाणी ती वाहून नेते.द्वीपकल्पीय भारतातील ही सर्वात लांब नदी महाराष्ट्र, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या तीन राज्यांमधून वाहते.

नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वर, कोपरगाव, पठाण, नांदेड, राजामुंदरी, आदिलाबाद आणि भद्राचलममधून जात डाकन पाथर ओलांडत अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, गडचिरोली व नांदेड या आठ जिल्ह्यांतून वाहत गोदावरी धर्माबादजवळ तेलंगणा राज्यात प्रवेश करते.पुढे आंध्रप्रदेशमधून राजमुंडीजवळ बंगालच्या उपसागरात जाते.

**गोदावरीचे धार्मिक संदर्भ**

१) पौराणिक कथेनुसार गौतम ऋषींनी गोहत्येचे प्रायश्चित म्हणून तपश्चर्या केली. शंकरांनी प्रसन्न होऊन ब्रह्मगिरी पर्वतावर जटा आपटल्या आणि गोदावरी पृथ्वीवर अवतरली. गौतम ऋषींनी गोदावरीत स्नान करून गोहत्येचे पाप धुतले. त्यामुळे तिला गोदावरी हे नाव पडले. ऋषी गौतम यांच्याशी जोडल्यामुळे तिला गौतमी असेही म्हणतात. या नदीत स्नान केल्याने सर्व पापे धुऊन जातात, म्हणूनच तिला "जुनी गंगा" किंवा "प्राचीन गंगा" असेही म्हटले जाते.

२) याशिवाय रामायण काळात नाशिकचा उल्लेख दंडकारण्य असा आहे. राम आपल्या १४ वर्षे वनवासाच्या कालावधीत येथेच राहिले. आजही गोदावरीत रामकुंड, सीताकुंड, तपोवन सारखी ठिकाणे या जुन्या पौराणिक उपासनेची झलक देतात. नाशिक "पंचवटी" म्हणून ओळखले जाते. राजा दशरथ वनवासात असताना रामाने आपल्या वडिलांचे दशरथाचे देहदान गोदावरी किनार्यावर केले होते. या सर्वामुळे गोदावरी नदी एक पवित्र स्थान आहे.

३) नाशिकमध्ये १२ शिवजोतीर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वर हे एक जोतिर्लिंग आहे. गोदावरीच्या तीराच्या धार्मिक महत्त्वामुळे गोदावरीचे पवित्र स्थान आजही अबाधित असून, भाविक आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी करतात.

४) याशिवाय अमृत – मंथनच्या वेळेस अमृताचे थेंब रामकुंड व त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त या ठिकाणी पडले. त्यामुळे दर १२ वर्षांनी सिहस्थ कुंभमेळा या ठिकाणी भरतो. देशभरातील साधू, संत-महंत व भाविक स्नानासाठी येतात. म्हणूनच गोदावरीला गंगे इतकेच महत्त्व आहे. गोदावरी नदी आंध्र प्रदेशातील पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील नरसापुरम जवळ बंगालच्या खाडीत वाहते.

तेथे पूर्व गोदावरी व पश्चिम गोदावरी जिल्हे आहेत. येथे गोदातीरी दर १२ वर्षांनी पुष्कर मेळावा भरतो त्याला कुंभमेळया इतकेच महत्त्व आहे.

५) त्र्यंबकेश्वर मधील ब्रह्मगिरी फेरीमध्ये ज्ञानदेवांचे मोठे बंधू आणि गुरु निवृत्तीनाथ ह्यांना नाथसांप्रदायी साधू गहिनीनाथ ह्यांच्याकडून दीक्षा मिळाली होती त्यामुळे नाथसंप्रदायासाठी देखिल हे क्षेत्र महत्वपूर्ण आहे.

६) त्याचप्रमाणे नांदेडमधील तख्त श्री हजूर, जिथे गुरु गोविंद सिंग यांनी शेवटचा श्वास घेतला. हे ठिकाण शीख धर्माच्या पाच पवित्र स्थळांपैकी एक आहे.

**आर्थिक महत्त्व**

द्वीपकल्पीय भारतातील सर्वात लांब असलेली गोदावरी नदी तीन राज्यांमधून वाहते. मध्य प्रदेश, कर्नाटक आणि छत्तीसगढ आणि ओडिशामधील काही भाग तिची खोरे म्हणून काम करतात. गोदावरी तीन कृषी हवामान झोन, सहा कृषी पर्यावरणीय क्षेत्रांमधून चालते आणि विविध प्रजाती आणि समुदायांचे घर आहे.गोदावरी खोऱ्यात ६० दशलक्षाहून अधिक लोक राहतात.

अशी ही गोदावरी जीवनदायीनी असून धमण्यांप्रमाणे दक्षिण भारतात कार्य करते.गोदेने हा परिसर समृद्ध ,सुजलाम् सुफलाम् केला आहे. गोदावरीच्या खो-यात खनिजतेल व नैसर्गिक वायूचे साठे सापडले आहेत. त्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणवर उद्योग व्यवसाय उत्पादनाचे काम चालते. येथे गोदावरीचे पात्र विस्तृत असल्याने मोठया प्रमाणावर अंतर्गत जल वाहतूक चालते. मासेमारी देखील इथला प्रमुख उद्योग आहे. गोदावरीच्या त्रिभुज प्रदेशात शेती केली जाते. सागरालगतच्या प्रदेशात मंग्रोह झाडांची जंगले आहेत. त्यांना स्थानिक तेलगु लोक माडा अडवी म्हणतात. या झाडांमूळे सुनामी, चक्रीवादळ, नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षण होते. अशाप्रकारे गोदावरी नदी सर्वार्थाने जीवनदायी अशी आहे.

एवढेच नाही तर गोदावरी नदीवर उभारलेल्या विविध प्रकल्पांनी गोदावरी नदीच्या आसपासचा परिसर समृद्ध केला आहे.

गोदावरी नदीवरील महत्त्वाचे प्रकल्प (Important Projects on River Godavari in Marathi)

१) आंध्र प्रदेशातील निजामाबाद जिल्ह्यात असलेला श्रीराम सागर प्रकल्प हा. गोदावरी नदीवरील बहुउद्देशीय प्रकल्प आहे

२) आंध्र प्रदेशातील गोदावरी नदीवर, पोलावरम गावाजवळ, जेथे पोलावरम सिंचन प्रकल्प आहे.

३) कलेश्वरम सिंचन प्रकल्प.
गोदावरी नदीवर, "सदरमत अनिकट" या नावाने ओळखले जाणारे दोन सिंचन प्रकल्प आहेत ज्यांचा सिंचन आणि निचरा या दोन्हीसाठी घापर केला जाऊ शकतो.

४) आंध्र प्रदेशातील गोदावरी आणि इंद्रावती नद्यांच्या संगमापासून १२ किलोमीटर अंतरावर इंचमपल्ली प्रकल्प आहे.

५) तेलंगणातील निजामाबाद जिल्ह्यात, गोदावरी

नदीवरील पोचमपाड जवळ, श्री राम सागर प्रकल्प आहे.

गोदावरी नदीवरील धरणाने देखील पाणीसाठा करून आजूबाजूच्या परिसराला पिण्यासाठी व वापरण्यासाठी पाणी पुरवठा केला आहे.

१) गोदावरी नदीवर "श्री राम सागर धरण" उभे आहे, जे सिंचनासाठी उपयुक्त आहे. गोदावरी नदीवरील इतर लक्षणीय बांधकामे म्हणजे घंटाघर,

२) जायकवाडी आणि

३) गंगापूर धरणे.

४) डोलेश्वरम येथे गोदावरी नदीवर एक धरण बांधले. १९८७ च्या पुरात उद्ध्वस्त झाल्यानंतर १९८७ मध्ये धरण आणि रस्ता म्हणून त्याची पुनर्बांधणी करण्यात आली आणि ते त्यांच्या सन्मानार्थ जतन करण्यात आले. डोलेश्वरममधील विजेश्वरम आणि पूर्व गोदावरीमधील पश्चिम गोदावरी हे रस्ते जोडलेले आहेत.

**समस्या**

एकंदरीतच गोदावरी चे धार्मिक आर्थिक महत्त्व अनन्यसाधारण असे ठरते मात्र अशा प्रकारे जनमानसाची तृष्णा भागवणाऱ्या जनजीवन सुरळीत ठेवणाऱ्या गोदावरीचे मात्र जनमानसाने संवर्धन हवे तसे केले नाही गोदामाई प्रति मनुष्य कृतघ्न झाला आहे.अंधश्रद्धा, कर्मकांडाच्या अविवेकी अतिरेकामुळे यामुळे गोदावरीच्या प्रदूषणाची समस्या निर्माण होऊन अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.जल प्रदूषणामुळे पाण्यात विशिष्ट गुणधर्मांचे पदार्थ मिसळले जातात यामुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होऊन ते वापरण्यास अयोग्य ठरते. जल प्रदूषणामुळे सजीवांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात किंवा पाण्याची चव बिघडते, ते घाणेरडे दिसते वा दुर्गंधीयुक्त होते. या सर्व कचऱ्यामुळे गोदावरीची गटारगंगा झाली आहे.

प्रस्तुत संशोधन निबंध धार्मिक कर्मकांडामुळे होणारे प्रदूषण अभ्यासतो.

**१) गणपती उत्सव**

गणपती उत्सव हा केवळ महाराष्ट्रात नाही तर भारतभरात साजरा होणारा सण आहे. सार्वजनिक मंडळे आणि घरोघरी अश्या लाखो श्रीगणेश मूर्तींची स्थापना केली जाते. उत्सवात दररोज फुलांच्या माळा, दुर्वा, पत्री, जास्वंदीची फुले, नैवेद्य हळद, कुंकू, तेल, कापूर,पाने-फुले असे निर्माल्य असते. दहा दिवसांत प्रत्येक घरात मोठय़ा प्रमाणात निर्माल्य साठते. गणपती विसर्जनाच्या दिवशी गणेशमूर्ती व हे निर्माल्य प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरून नदीत/मृदा व जलसंधारण विभागाच्या जलाशयात व सिंचन तलाव/साठवण तलाव/पाझर तलाव/गाव तलाव/बंधाऱ्यामध्ये विसर्जित केले जाते. निर्माल्यातील जे सामान विघटित होत नाही यामुळे नद्या कुंठीत व प्रदूषित होतात. गोदावरीच्या प्रवाहात ठिकठिकाणी या प्लास्टिकच्या पिशव्या अडकून अवरोध निर्माण करतात.

**२) अंत्यसंस्कार**

नदीकाठी अंत्यविधी, दशक्रिया विधी व मृत्यूउपरांत क्रिया देखील केल्या जातात.रक्षा विसर्जन, केस टाकणे, मृत व्यक्तीची आठवण नको, म्हणून त्यांचे कपडे, फोटो, वस्त्रे नदीपात्रात जातात.काही ठिकाणी मृतदेहास जलार्पण करण्याच्या प्रथा आहेत,त्यातून प्रदूषण वाढीस लागते.

हिंदू धर्मातील रितीरिवाजानुसार मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी दहावा, तेरावा, मासिक तसेच वार्षिक श्राद्धप्रसंगी पिंडदान केले जाते.तसेच पूजा, शांती विधीचे निर्माल्य, फुले, उर्वरित साहित्य व अन्न नदीमध्येच विसर्जित केले जाते. हा पिंडदानाचा विधी पवित्र नदीच्या काठी करण्यास विशेष महत्त्व आहे. गोदावरी नदी ही पवित्र मानली गेल्यामुळे मृत व्यक्तीच्या

आत्म्याला शांती लाभावी यासाठी दुरून दुरून नागरिक याठिकाणी धार्मिक विधीसाठी येतात.

**३) इतर धार्मिक कर्मकांड**

याशिवाय जन्मपत्रिकेतील विविध दोष, विविध गृहांच्या शांती व इतर अनेक दोष निवारण करण्या साठी अनेक प्रकारचे धार्मिक विधी केले जातात. या विधीचेही. निर्माल्य तसेच पूजा, शांती विधीचे निर्माल्य, फुले, उर्वरित साहित्य व अन्न नदीमध्येच विसर्जित केले जाते. यातून नदी अस्वच्छ व प्रदूषित होते.

याशिवाय धार्मिक मंडळांतर्फे मोठ्या प्रमाणात लंगर,भांडाऱ्याचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. [illegible] प्लास्टिक प्लेटस् व वाट्यांचा उपयोग केला जातो. ते ही नदीकाठी, नदीत टांकले जातात प्लास्टिक मातीत नष्ट होत नाही, यामुळे नदीकाठचा परिसर नापीक बनतो.

जल प्रदूषणामुळे पाण्यात विशिष्ट गुणधर्मांचे पदार्थ अशा प्रमाणात मिसळले जातात की, त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होऊन पाण्याची चव बिघडते, ते घाणेरडे दिसते वा दुर्गंधीयुक्त होते व वापरण्यास अयोग्य ठरते. जल प्रदूषणामुळे सजीवांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात .

एकंदरीत विचार करता ज्या पाण्याला जीवन म्हंटले जाते त्याच पाण्याचे रूपांतर विषात करण्याचे काम मनुष्य जाणता,अजाणता करत आहे, यात शंका नाही. सरकारी तसेच विविध खाजगी संघटनांचे नदी संवर्धनासंदर्भात सकारात्मक कार्य व योजना-

**१)"चला जाणूया नदीला" अभियान**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त येणाऱ्या काळात नद्यांचे प्रदूषण कमी व्हावे यासाठी. २ ऑक्टोबर ला "चला जाणूया नदीला" अभियान राज्य शासनाकडून सुरू करण्यात आले आहे. नदीला जाणून घेणे आणि तिच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांची सोडवणूक करणे हे या अभियानातून अभिप्रेत आहे.लहान नदीपासून मोठ्या नदी पर्यंतची मिळत जाणारी ही श्रृंखला याला पर्यावरणातील असमतोलाचा मोठा धोका निर्माण झाला असून आपल्या नदीला यातून सावरण्यासाठी "चला जाणुया नदीला" हे अभियान अत्यंत महत्वाचे आहे. या अभियानाअंतर्गत लोकसहभागातून नदी संवाद यात्रा आता राज्यभर सुरू उरु करण्यात आली असून यासंदर्भात राज्यस्तरीय तसेच जिल्हावार समित्या निर्माण करण्यात आल्या आहेत. राज्याचे मुख्य सचिव राज्यस्तरीय समितीचे प्रमुख आहेत. अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यातून वाहणाऱ्या निवडक नद्यांबाबतची माहिती, तिचा प्रचार-प्रसार आणि त्यानुषंगिक बाबींसाठी सहाय्य करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय समित्या गठीत करण्यात आल्या आहे.

**लोकसहभाग व नैतिक कर्तव्य**

या अभियानाचे यश लोकसहभागात असून, प्रत्येक समिती लोकसहभाग जास्तीत जास्त राहील यासाठी प्रयत्नरत आहे. नागरिकांची कर्तव्य तत्परता व जबाबदार प्रशासन यातच नदी व पर्यावरणाच्या संतुलनचा मार्ग आहे.यासाठी लोकांनी कटिबद्ध होणे गरजेच आहे.भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकांकडून जी जबाबदारीचे, कर्तव्य तत्परतेची अपेक्षा व्यक्त केली आहे ती आपण प्रत्येकाने देशसेवेच्या माध्यमातून पूर्ण केली पाहिजे. नदी, नदीचे आरोग्य पर्यावरणातील असमतोल, प्रदूषण, अस्वच्छता ही केवळ शासकीय यंत्रणेमुळे होते असे नाही. नियमांचे काटेकोर पालन नागरिकांकडूनही अपेक्षित आहे. जोपर्यंत शासनासमवेत समाज जोडला जाणार नाही तोपर्यंत बदलाच्या अपेक्षा व्यक्त करणे उचित नाही.सजग नागरिक म्हणून आपले भोवताल आणि नदीचे पावित्र्य राखण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. नदीच्या साक्षरतेच्यादृष्टिने हे अभियान अत्यंत महत्वपूर्ण असून याला अधिकाधिक व्यापक करण्यासाठी सर्व स्तरावरुन प्रयत्न होण्याची गरज आहे. या अभियानात शिक्षण संस्थाही तेवढ्याच हिरीरीने सहभाग झाल्यामुळे युवकांमध्येही जाणिव जागृती

झाल्यास नद्यांना चांगले दिवस येतील . चळवळीत युवकांचा वाढत जाणारा सहभाग हा सर्वांचा उत्साह द्विगुणित करणारा आहे. त्यांना योग्य दिशा मिळाली तर ही चला जाणू या नदीला ही चळवळ दिशादर्शक असेल.

**अभियानाची उद्दिष्ट्ये**

१) जनसामान्यांना नदीसाक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे.

२) नागरीकांच्या सहकार्याने नद्यांचा सर्वकष अभ्यास करणे व त्याबाबतचा प्रचार व प्रसार करणे.

३) नदीला अमृत वाहिनी बनविण्यासाठी कार्यक्रमाचा मसुदा तयार करणे.

४) नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रुपरेषा आखणे.

५) नदीचा तट, प्रवाह आणि परिसरातील जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्हयात प्रचार प्रसार याबाबत नियोजन करणे.

६) नदी खोऱ्यांचे नकाशे, नदीची पुर रेषा व पाणलोट क्षेत्रांचे नकाशे, मातीचे क्षरण, पर्जन्याच्या नोंदी, मागील पाच वर्षातील पूर .आणि दुष्काळाच्या नोंदी या बाबतची माहिती संकलित करणे.

७) पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजल स्तर उंचावणे यावर भर असेल.

८) अभियानाबाबत जनजागृती करणे,अतिक्रमण, शोषण आणि प्रदुषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास व त्याचा परिणाम अभ्यासणे.

९) नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणे.

१०) नदीचे स्वरुप अमृत वाहिनीमध्ये कसे आणता येईल याचा अभ्यास करणे.

**२)"नमामी गोदा"परियोजना**

भारतातील दुसऱ्या नंबरची सर्वात मोठी नदी गोदावरी प्रदूषण,शोषण,अतिक्रमण विळख्यात अडकली आहे.

स्थानिक पातळीवर गोदावरी नदी संसद नांदेड, गोदावरी गटारीकरण विरोधी मंच नाशिक,वृक्षमित्र फौंडेशन अश्या विविध पर्यावरण प्रेमी संघटना गोदावरी नदी साठी सतत कार्य करीत आहेत.पर्यावरण प्रेमी यांच्या प्रयत्नांना काही प्रमाणात यश मिळाले आहे. गोदावरी नदी ची समस्या पूर्णतः सोडविण्यासाठी "नमामी गोदा"परियोजनेला एप्रिल २०२२ मध्ये मान्यता भेटली.यासाठी १८२३ करोड रु. निधी मान्य करण्यात आला आहे.

**३)'देव द्या, देवपण घ्या' हा उपक्रम- नाशिक**

नाशिकमध्ये विद्यार्थी कृती समितीच्या वतीने 'देव द्या, देवपण घ्या' हा उपक्रम राबविला जातो.आकाश पगार यांनी सन २०१० मध्ये या उपक्रमास सुरुवात केली आहे. उपक्रमांतर्गत गणेश मंडळाच्या ६ फुटांपेक्षा जास्त उंचीच्या व घरगुती गणेशोत्सवातील मुर्ती संकलित करण्यात येतात. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी समितीचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी गोदापार्क येथे उभा राहून मुर्ती व निर्माल्य गोळा करतात. त्यानंतर त्या महापालिकेकडे सुपूर्द करण्यात येतात.दक्षिणेची गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोंदावरी नदीचे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे प्रदूषण होऊ नये यासाठी हा उपक्रम राबविला जात असून यामुळे गोदेचा परिसर बऱ्याच अंशी प्रदूषण मुक्त होण्याची आशा आहे.

**४) ऊर्जा प्रतिष्ठान पर्यावरणपूरक पिशव्याने वाटप**

ऊर्जा युवा प्रतिष्ठानच्या वतीने निर्माल्य गोदावरीत टाकून होणारे प्रदूषण थांबविण्यासाठी पर्यावरणस्नेही पिशव्यांचे वाटप गणेशभक्तांना करण्याचा अभिनव उपक्रम चालवण्यात येतो. नागरिक गणपती उत्सवातील साठवलेले निर्माल्य या पिशव्यांमध्ये संकलित करतात. निर्माल्याचे पावित्र्य राखून त्याचा योग्य आणि नैसर्गिक पद्धतीने विनियोग केला जातो.

उत्साहात कळत-नकळत आपल्याकडून आणि जल प्रदूषण तर होत नाही ना, याची काळजी घेतली पाहिजे. गोदावरीचे प्रदूषण रोखणे व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी या उपक्रमात नाशिककरांनी सहभागी व्हावे, असेही प्रतिष्ठानने म्हटले आहे.

**५) महापालिका संरक्षक जाळ्या बसविणे**

नाशिक- गोदावरीचे निर्माल्यामुळे वाढणारे प्रदूषण रोखण्याकरिता महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व पुलांवर जाळ्या बसविण्याचा निर्णय घेतला आहे. जाळ्या बसविल्याने नदीपात्रात पडणार्या निर्माल्यामुळे वाढणार्या प्रदूषणाला आळा बसण्याची शक्यता आहे.

गोदावरीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनासह विविध सेवाभावी संघटना कार्यरत असूनही, गोदापात्रात निर्माल्य टाकण्याचे प्रकार सर्रास सुरूच आहेत. त्या पार्श्वभूमीवर नदीचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाने पुलांवर संरक्षक जाळ्या बसविण्याचे काम हाती घेतले आहे. या जाळ्यांमुळे निर्माल्य फेकण्यास अटकाव होईल. टप्प्याटप्प्याने सर्वच पुलांवर, तसेच जेथून पात्रात निर्माल्य टाकले जाऊ शकते, अशा संभाव्य ठिकाणांवर या जाळ्या बसविल्या जातील.

**६)अंधश्रद्धा निर्मूलन समिती**

पाण्याचे स्त्रोत प्रदूषित होऊ नये म्हणून सर्वोच्च न्यायालय, शासन व पाणी प्रदूषण मंडळाने आदेश दिले आहेत. याचा आधार घेत नदी, नाले, विहिरींतील विसर्जन रोखून जलस्त्रोत नष्ट होण्यापासून थांबवावे, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केली आहे. वास्तविक सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, महाराष्ट्र अंनिसच्या याचिकेवर औरंगाबाद उच्च न्यायालयाने दिलेले आदेश, महाराष्ट्र शासनाने काढलेले आदेश, केंद्रीय व राज्य पाणी प्रदूषण मंडळ यांनी मूर्ती व निर्माल्यामुळे पिण्याचे व वापरात येणारे पाणी प्रदूषित होणार नाही, यासाठी आदेश दिले आहेत. मात्र त्या आदेशाची अंमलबजावणी अपेक्षेप्रमाणे होत नाही. जिल्ह्यातील सर्व नदी, नाला, ओढ्यावर वा इतर पर्यायी हौद निर्माण केले नाहीत. यामुळे न्यायालयाच्या आदेशाची अवमानना होत आहे. ती होऊ नये म्हणून लोकांना पर्याय उपलब्ध करून द्यावा. यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्यरत आहे.

अनेकदा हिंदु जनजागृतीसारख्या संघटना नदीतच मूर्तींचे विसर्जन करा, असे सांगतात. त्यांना समज देत प्रसंगी गुन्हे दाखल करावे, भाविकांचे प्रबोधन करावे, अशी मागणी अंधश्रध्दा निर्मूलन समितीने निवेदनातून केली आहे.

**उपाययोजना**

गोदावरी नदी तसेच इतर नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक बनले आहे.

१. नद्यांचे अंधश्रद्धा व कर्मकांडातून होणारे प्रदूषण कमी करून नद्या वाचविणे.
२. नियमित पाण्याची तपासणी करून घेणे.
३. कुठलाही घन कचरा/निर्माल्य नदी मध्ये टाकण्यास प्रतिबंध करणे. केल्यास दंडात्मक कार्यवाही कठोरपणे राबवणे.
४. विविध क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्याने उपाय योजना राबविणे.
५. नदीच्या शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे.
६. विद्यार्थी, समाजसेवी यांना नदीशी जोडून स्वच्छता अभियान राबविणे.
७. अंधश्रद्धा निर्मूलन करून, कर्मकांडांस नियंत्रित करण्याविषयी जनजागृती अभियान राबवणे.

अंतीमसंस्कारविषयी जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. पुजाऱ्यांनी यजमानांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. या सर्व धार्मिक विधी नदीपरिसरातील मंदिराच्या आवारात होतात. या कुंडात साठवलेल्या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करता येते. त्या निर्माल्याची व्यवस्थित विल्हेवाट लावण्याची

जबाबदारी स्थानिक प्रशासन व देवस्थान समितीची आहे.होतात.तेव्हा मंदिर समितीने ही जबाबदारी घेऊन ठिकाणी पूजेचे निर्माल्य विसर्जित करण्यासाठी योग्य सूचना फलक लावण्याची निर्माल्य कुंड व इतर पर्यायी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.ज्या ठिकाणी सुचनाफलक असूनही सूचनेचे कोणीही पालन करताना दिसत नाही.त्यांच्यावर कार्यवाही करणे गरजेचे आहे.

या कुंडात साठवलेल्या निर्माल्यापासून कंपोस्ट खत तयार करता येते. परंपरा व पर्यावरणाचा समन्वय साधण्यासाठी धार्मिक विधी नाममात्र करत पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक आहे.

विसर्जित करण्यासाठी केवळ एक मूठ रक्षा वापरून इतर रक्षा शेतात टाकून झाड लावावे, जेणेकरून धार्मिक विधी होतील मात्र, पर्यावरणाचे नुकसान होणार नाही. अशा प्रकारे बदल झाल्यास नदी स्वच्छ होऊन पर्यावरणाचे संवर्धन होईल.

**२) पर्यावरणपूरक सामान वापरावे**

उत्सव काळात धार्मिक मंडळांतर्फे मोठ्या प्रमाणात लंगरचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. यात प्लास्टिक प्लेटस् व वाट्यांचा उपयोग केला ज़ातो. त्या नदीत किंवा कोठेही फेकल्या जातात. प्लास्टिक मातीत नष्ट होत नाही यामुळे प्रदूषण होते. तेव्हा भांडाऱ्यामध्ये प्लास्टिक प्लेट व वाट्यांचा उपयोग न करता पळसाच्या पानाच्या पत्रावळी, द्रोणचा वापर करावा.

**निष्कर्ष**

नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रबोधन चळवळीला व्यापक व गतिमान करणे गरजेचे बनले आहे. विविध धार्मिक विधीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्यामुळे नद्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडल्या आहेत. नद्यांचे पाणी वाहते ठेवणे, नद्या स्वच्छ राखणे, प्रदूषण विरहित राखणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यासाठी लोकांमध्ये प्रबोधन घडवून आणणे गरजेचे आहे. वास्तविक धर्म, धार्मिक कर्मकांड हा भावनिक मुद्दा असल्याने लोक त्याप्रति अपरिवर्तनीय व कर्मठ असतात. त्यामुळे सक्तीने परिवर्तन होऊ शकत नाही म्हणूनच कर्मकांडातील फोलपणा,त्यामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान याविषयी सकारात्मक प्रबोधन करावे लागेल.

•••

**- प्रा. डॉ. सिल्केशा भारत अहिरे**
इतिहास विभागप्रमुख,
आनंद महाराज महाविद्यालय, नाशिक
मो. ९५१८५५७६१३
Email : pbsociology2028@gmail.com

**- प्रो.डॉ. प्रतिभा अहिरे**
समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय,
कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर
मो. ९२८४१९६३०४
Email : pratibhaahire68@gmail.com